३५६

# MAHARASHTRA ACT No. LVIII OF 1981

## THE MAHARASHTRA PRIVATE SECURITY GUARDS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1981

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती, दिनांक २४ सप्टेंबर १९८१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एस. ए. धोने,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. LVIII OF 1981

## AN ACT FOR REGULATING THE EMPLOYMENT OF PRIVATE SECURITY GUARDS EMPLOYED IN FACTORIES AND ESTABLISHMENTS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MAKING BETTER PROVISIONS FOR THEIR TERMS AND CONDITIONS OF EMPLOYMENT AND WELFARE, THROUGH THE ESTABLISHMENT OF A BOARD THEREFOR AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २५ सप्टेंबर १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

### सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८

**एक मंडळ स्थापन करून, त्याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील कारखाने व आस्थापना यांतून कामावर ठेवलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे यांकरता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** एक मंडळ स्थापन करून, त्याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील कारखाने व आस्थापना यांतून कामावर ठेवलेल्या खाजगी सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यांसाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे यांसाठी कायदा करण्याकरता महाराष्ट्राच्या राज्यपालांना तातडीने कार्यवाही करणे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली आणि म्हणून त्यांनी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण),
१९८१ चा महा. अध्या. ५. अध्यादेश, १९८१ हा २९ जून १९८१ रोजी प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ असे म्हणता येईल;

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल;

(३) हा अधिनियम, २९ जून १९८१ रोजी फक्त बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल. तो राज्याच्या कोणत्याही इतर क्षेत्रात, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्या क्षेत्रासाठी त्या बाबतीत नेमील त्या तारखेस अंमलात येईल, अणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी वेगवेगळ्या तारखा नेमून देता येतील.

(४) तो, ज्या व्यक्ती कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत सुरक्षा रक्षक म्हणून काम करत असतील परंतु ज्या, यथास्थिति, कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या प्रत्यक्ष किंवा नियमित कर्मचारी नसतील अशा व्यक्तींना लागू असेल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) सुरक्षा रक्षकांच्या संबंधात, "एजन्सी" किंवा "एजंट" म्हणजे, असा सुरक्षा रक्षक, मजुरीवर किंवा अन्य प्रकारे, कामावर ठेवून, कोणत्याही कारखान्यासाठी किंवा आस्थापनेसाठी कोणतेही सुरक्षाविषयक काम किंवा राखण व पहाऱ्याचे काम पार पाडण्याची जबाबदारी घेत असेल अशी, किंवा असे सुरक्षा रक्षक एकतर गटागटाने किंवा एकएकटे पुरवीत असेल अशी एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था किंवा निगम निकाय, आणि त्यात सब-एजन्सी किंवा सब-एजंट यांचा समावेश होतो;

(१-अ) सल्लागार समिती म्हणजे, कलम १५ अन्वये रचना करण्यात आलेली समिती;

(२) "मंडळ" म्हणजे, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले मंडळ;

(३) एजन्सी किंवा एजंट यांच्याकडून किंवा त्यांच्याद्वारे कामावर लावण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकाच्या संबंधात "मालक" म्हणजे मूळ मालक, आणि कोणत्याही अन्य सुरक्षा रक्षकाच्या संबंधात, कारखान्याच्या किंवा आस्थापनेच्या कामकाजाचे अंतिम नियंत्रण जिच्या हाती असेल अशी व्यक्ती, आणि त्यात, अशा कारखान्याचे किंवा आस्थापनेचे कामकाज जिच्याकडे सोपविले असेल अशा कोणत्याही इतर व्यक्तीचा, समावेश होतो, मग अशा व्यक्तीस एजंट किंवा व्यवस्थापक म्हणून संबोधण्यात येत असो किंवा कारखान्यात किंवा आस्थापनेत प्रचलित असलेल्या कोणत्याही इतर नावाने संबोधण्यात येत असो;

(४) "आस्थापना" म्हणजे, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ याच्या कलम २, खंड (८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे आस्थापना; १९४८ चा मुंबई ७९.

(५) "कारखाना" म्हणजे, कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम २, खंड (म) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणेचा कारखाना; १९४८ चा ६३.

(६) "निरीक्षक" म्हणजे, कलम १६ अन्वये नेमलेला निरीक्षक;

(७) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित;

(८) "मूळ मालक" म्हणजे एजन्सीमार्फत किंवा एजंटामार्फत ज्याने सुरक्षा रक्षकांना कामावर ठेवलेले आहे असा मालक;

(९) "योजना" म्हणजे, या अधिनियमान्वये तयार केलेली योजना;

(१०) "सुरक्षा रक्षक" किंवा "खाजगी सुरक्षा रक्षक" म्हणजे, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत, सुरक्षेचे काम किंवा राखण व पहाऱ्याचे काम करण्यासाठी, कोणत्याही एजन्सी-मार्फत किंवा एजंटामार्फत, कामावर ठेवण्यात आलेली किंवा कामावर ठेवण्यात येणारी व्यक्ती, मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो वा नसो आणि त्यात, कोणत्याही मालकाने किंवा

एजन्सीने किंवा एजंटाने जिला नोकरीवर ठेवले नसेल परंतु त्या मालकाच्या किंवा एजन्सीच्या किंवा एजंटाच्या परवानगीने, किंवा मालकाशी किंवा एजन्सीशी किंवा एजंटाशी केलेल्या करारान्वये काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो. परंतु त्यात, कोणत्याही मालकाच्या कुटुंबातील व्यक्तीचा किंवा मूळ मालकाचा प्रत्यक्ष व नियमित कर्मचारी असेल अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होणार नाही ;

(११) "वेतन" म्हणजे, नोकरीच्या कराराच्या, सुस्पष्ट किंवा गर्भित, शर्ती पूर्ण केल्यावर, पैशाच्या रूपात, व्यक्त करण्यात येणारे किंवा व्यक्त करता येण्याजोगे, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत केलेल्या सुरक्षाविषयक कामाच्या किंवा राखण व पहाऱ्याच्या कामाच्या संबंधात, सुरक्षा रक्षकाला देय होणारे सर्व पारिश्रमिक, परंतु त्यात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही :—

(एक) कोणतीही निवासव्यवस्था, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, वैद्यकीय उपचार यांचे मूल्य; किंवा राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे वेतनाची मोजणी करताना वगळण्यात येणारी इतर कोणतीही सुविधा किंवा कोणतीही सेवा;

(दोन) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीला किंवा भविष्यनिर्वाह निधीला किंवा सामाजिक विम्याच्या कोणत्याही योजनेन्वये, मालकाकडून देण्यात येणारे कोणतेही अंशदान व त्यावर उपार्जित झाले असेल असे व्याज ;

(तीन) कोणताही प्रवास भत्ता किंवा कोणत्याही प्रवास सवलतीचे मूल्य ;

(चार) सुरक्षा रक्षकाच्या नोकरीच्या स्वरूपामुळे त्याला करावा लागणारा विशेष खर्च भागविण्यासाठी त्याला देण्यात येणारी कोणतीही रक्कम ; किंवा

(पाच) सेवामुक्तीनंतर देय होणारे कोणतेही उपदान.

**सुरक्षा रक्षकांना नियमित नोकरी मिळावी हे निश्चित करण्यासाठी योजना.**

३. (१) कारखाने व आस्थापना यांसाठी सुरक्षा रक्षकांचा पुरेसा पुरवठा व्हावा व त्यांचा पूर्णपणे व यथोचित उपयोग व्हावा यांसाठी व सामान्यत: अशा कामगारांच्या, नोकरीच्या अटी व शर्ती यांकरिता अधिक चांगली तरतूद करण्यासाठी, राज्य शासनास, एका किंवा अधिक योजनांद्वारे कोणताही कारखाना किंवा आस्थापना यांतील मालकांच्या व सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीची तरतूद करता येईल आणि नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या नोकरीच्या अटी व शर्ती यांची तरतूद करता येईल आणि अशा सुरक्षा रक्षकाच्या सर्वसाधारण कल्याणासाठी तरतूद करता येईल.

(२) विशेषेकरून योजनेमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या व मालकांच्या वर्गांना ती योजना लागू करणे ;

(ब) जी बंधने पुरी करण्याच्या अधीन ती योजना नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांना व मालकांना लागू होईल ती बंधने निश्चित करणे ;

(क) नोंदणीपुस्तके ठेवणे, नोंदणीपुस्तकातील नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे किंवा पूर्ववत करणे व नोंदणीसाठी लादावयाची फी, यांसह सुरक्षा रक्षकांची भरती व त्यांना योजनेत दाखल करून घेणे आणि सुरक्षा रक्षक व मालक यांची नोंदणी यांचे नियमन करणे ;

(ड) नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे आणि वेतनाचे दर, कामाचे तास, प्रसूति लाभ, अतिकालिक प्रदान, वेतनासह रजा आणि उपदानासाठी तरतूद यांसह अशा नोकरीच्या अटी व शर्ती आणि साप्ताहिक आणि इतर सुट्यांसंबंधीच्या शर्ती व त्या सुट्यांबाबतचा पगार यांचे नियमन करणे ;

(ई) नोंदलेल्या मालकांनी नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांना, त्यांनी केलेल्या कामाबद्दल द्यावयाच्या वेतनाची रक्कम ज्या कालावधीत मंडळाकडे भरावयाची त्या कालावधीची तरतूद करणे ; मंडळाच्या मते, वर सांगितल्याप्रमाणे ठराविक कालावधीत अशी वेतनाची रक्कम भरण्यात जे

कसूर करत असतील त्या मालकांना, उपरोक्तप्रमाणे भरावयाच्या वेतनाच्या रकमेच्या मासिक सरासरी इतकी रक्कम मंडळाकडे अनामत म्हणून ठेवण्यास भाग पाडणे ; कोणत्याही वेळी अशी अनामत रक्कम अशा सरासरीपेक्षा कमी पडेल त्या बाबतीत, अशी रक्कम भरण्यात जे सातत्याने कसूर करतात अशा मालकांना मंडळ ठरवून देईल त्याप्रमाणे, मंडळाकडे भरावयाच्या अशा रकमेच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त नाही इतक्या रकमेचा अधिभार, शास्ति म्हणून, भरण्यास भाग पाडणे ;

(फ) नोंदलेले सुरक्षा रक्षक कामासाठी उपलब्ध असूनही त्यांना ज्या मुदतीत नोकरी किंवा पूर्ण (वेळ) नोकरी उपलब्ध नसेल त्या मुदतीसंबंधी अशा सुरक्षा रक्षकांना योजनेच्या शर्तीस अधीन, हमी दिलेले किमान वेतन मिळेल याची निश्चिती करणे ;

(ग) योजना ज्यांना लागू होत नसेल अशा सुरक्षा रक्षकांची नोकरी आणि योजना लागू न होणाऱ्या मालकांनी सुरक्षा रक्षकास कामावर ठेवणे यांस मनाई करणे, त्यावर, निर्बंध घालणे किंवा अन्य प्रकारे त्याचे नियंत्रण करणे ;

(ह) योजनेच्या कक्षेत येणाऱ्या नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कल्याणासाठी योजनेत जेथवर समाधानकारक तरतूद नसेल तेथवर, योजनेशिवाय स्वतंत्र रीत्या अशा सुरक्षा रक्षकाचे कल्याण;

(आय) नोंदलेले सुरक्षा रक्षक काम करीत असलेल्या ठिकाणी, आरोग्य व सुरक्षितता यांच्या उपाययोजनेसाठी समाधानकारक तरतूद करणे आवश्यक असेल परंतु ती करण्यात आली नसेल तेथवर योजनेशिवाय स्वतंत्र रीत्या आरोग्य व सुरक्षितता यांसाठी उपाययोजना करणे;

(जे) नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या लाभासाठी भविष्यनिर्वाह निधीसह कोणताही निधी किंवा कोणतेही निधी प्रस्थापित करणे, असे निधी निहित करणे, अशा निधींना द्यावयाचे अंशदान व निधींचा भरणा, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी व संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५२ याचे उपबंध व अशा नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कामाच्या परिस्थितीशी अनुरूप ठरतील असे आवश्यक ते फेरबदल केलेली, उक्त अधिनियमाखालील योजना विचारात घेऊन, भविष्यनिर्वाह निधी व अंशदानाचे दर यांसाठी करण्यात येणारी तरतूद व त्यासंबंधीच्या सर्व बाबी ; १९५२ चा १९.

(के) योजना अंमलात आणण्याचा खर्च ज्या रीतीने, ज्या दिवसापासून (भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावासह) व ज्या व्यक्तींनी भागवावयाचा, ती रीत, तो दिवस व त्या व्यक्ती ;

(ल) योजनेच्या अंमलबजावणीसाठी व उपरोक्त प्रयोजनांसाठी प्रस्थापित केलेल्या निधीच्या व्यवस्थेसाठी ज्या व्यक्ती किंवा प्राधिकरणे जबाबदार असतील त्यांची नेमणूक करणे ;

(म) खंड (ल) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींना किंवा प्राधिकरणांना ज्यांचा वापर करता येईल किंवा जे बजावता येतील असे अधिकार आणि कर्तव्ये विनिर्दिष्ट करणे आणि अशा व्यक्तींच्या आणि प्राधिकरणांच्या आदेशांविरुद्ध किंवा निर्णयांविरुद्ध अपिले आणि पुनरीक्षणाचे अर्ज करण्याविषयी तरतूद करणे आणि अशा अपिलांचा आणि अर्जांचा निर्णय करणे आणि त्याला आनुषंगिक असणाऱ्या गोष्टी ;

(न) योजनेची प्रयोजने अंमलात आणण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा आनुषंगिक किंवा पूरक बाबी.

(३) योजनेत आणखी अशीही तरतूद करता येईल की, तिच्या कोणत्याही उपबंधाच्या उल्लंघनाबद्दल दोषसिद्धीनंतर, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या कारावासाची (परंतु ती कोणत्याही बाबतीत, पहिल्या उल्लंघनाबद्दल तीन महिन्यांपेक्षा किंवा नंतरच्या कोणत्याही उल्लंघनासाठी सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची नसेल) किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या रकमेपर्यंतच्या दंडाची (परंतु ती कोणत्याही बाबतीत, पहिल्या उल्लंघनाबद्दल पाचशे रुपयांपेक्षा व नंतरच्या कोणत्याही उल्लंघनाबद्दल एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल) किंवा कारावासाची व दंडाची अशा दोन्ही शिक्षा देण्यात येतील आणि दोषसिद्धीनंतर उल्लंघन करण्याचे चालू राहिले तर अशा प्रकारचे उल्लंघन चालू राहील अशा प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयांपर्यंत असेल अशा आणखी दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(४) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) २[illegible] जून १९८१ रोजी व त्या दिवसापासून, कोणताही मूळ मालक किंवा एजन्सी किंवा एजंट, केवळ या कलमान्वये तयार केलेल्या योजनेखाली स्वत:ची नोंदणी करून घेणे हे मालकाचे दायित्व असल्याच्या कारणावरून, किंवा अशा योजनेअन्वये त्याच्यावर लादले जाण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही अन्य दायित्वाच्या कारणावरून, किंवा अशा योजने अन्वये स्वत:ची नोंदणी करून घेणे हे सुरक्षा रक्षकाचे दायित्व असल्याच्या कारणावरून, उक्त तारखेपासून अशा प्रकारे तयार केलेली संपूर्ण योजना अशा मालकास आणि सुरक्षा रक्षकास लागू करण्यात आली असेल त्या तारखेपर्यंतची मुदत किंवा उक्त तारखेपासून एक वर्षाची मुदत यापैकी आधीची असेल अशा मुदतीत, कोणत्याही सुरक्षा रक्षकाला नोकरीतून बडतर्फ, मुक्त किंवा कमी करणार नाही. किंवा अन्यथा त्याला नोकरीतून काढून टाकणार नाही; आणि

(ब) राज्याच्या कोणत्याही अन्य क्षेत्रांत हा अधिनियम किंवा त्याचे कोणतेही उपबंध ज्या तारखेस आणि ज्या तारखेपासून अंमलात आले असतील त्या तारखेस आणि त्या तारखेपासून, कोणताही मूळ मालक किंवा एजन्सी किंवा एजंट, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणावरून, उक्त तारखेपासून या कलमान्वये तयार केलेली संपूर्ण योजना ज्या तारखेस अशा मालकाला आणि सुरक्षा रक्षकाला लागू करण्यात आली असेल त्या तारखेपर्यंतच्या मुदतीत कोणत्याही सुरक्षा रक्षकाला नोकरीतून बडतर्फ, मुक्त किंवा कमी करणार नाही किंवा अन्यथा त्याला नोकरीतून काढून टाकणार नाही; परंतु, कोणत्याही सुरक्षा रक्षकाविरुद्ध केलेल्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीदाखल त्यास नोकरीवरून बडतर्फ, मुक्त किंवा कमी करण्याच्या किंवा अन्यथा त्यास नोकरीवरून काढून टाकण्याच्या मालकाच्या, एजन्सीच्या किंवा एजंटाच्या हक्कास या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणरा नाही.

४. (१) राज्य शासनास, कलम १५ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर व शासकीय राजपत्रातील अधिसूचनाद्वारे आगाऊ प्रसिद्ध करण्यात येईल या शर्तीच्या अधीन, अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या, एका किंवा त्याहून अधिक क्षेत्रात, सुरक्षा रक्षकांसाठी, सुरक्षा रक्षकांच्या गटासाठी किंवा गटांसाठी एक किंवा त्याहून अधिक योजना करता येतील; आणि त्याने केलेल्या कोणत्याही योजनेत, त्याच रीतीने भर घालता येईल, तीत सुधारणा करता येईल, तीत बदल करता येईल, किंवा त्याने केलेल्या योजनेऐवजी दुसरी योजना तयार करता येईल : योजना करणे, तीमध्ये बदल करणे व ती रद्द करणे.

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना, शासकीय राजपत्रात ती प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याचा कालावधी समाप्त झाल्याखेरीज, अंमलात येणार नाही.

१९०४ (२) मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम २४ चे उपबंध (नियम),
चा आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील या शर्तीस अधीन राहून, महाराष्ट्र अधिनियमाद्वारे देण्यात आलेल्या,
मुंबई नियम करण्याच्या अधिकारांचा वापर करताना ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते, पोट-कलम
१. (१) अन्वये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना लागू होतील.

५. सुरक्षा रक्षक किंवा मालक यांच्या कोणत्याही वर्गास कोणतीही योजना लागू होते किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, ती बाब, राज्य शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि कलम १५ अन्वये रचना करण्यात आलेल्या सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर राज्य शासन त्या प्रश्नावर जो निर्णय घेईल तो अंतिम असेल. योजना लागू करण्यासंबंधी विवाद.

६. (१) राज्य शासनास, कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही सुरक्षा रक्षकांसाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने ओळखण्यात येणाऱ्या मंडळाची स्थापना करता येईल. एका किंवा अनेक क्षेत्रांसाठी किंवा सुरक्षा रक्षकांच्या एका किंवा अनेक वर्गासाठी एका किंवा अनेक मंडळांची रचना करता येईल. मंडळाची रचना.

(२) असे प्रत्येक मंडळ हे, पूर्वोक्त नावाचे निगमनिकाय असेल, त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा सामाईक शिक्का असेल, त्याला मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल आणि त्या नावाने त्याला किंवा त्याच्याविरुद्ध, दावा लावता येईल.

(३) मंडळ, राज्य शासनाने वेळोवेळी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचे मिळून होईल व त्यामध्ये, मालक, सुरक्षा रक्षक व राज्य शासन यांना प्रतिनिधित्व असेल.

(४) मालक आणि सुरक्षा रक्षक यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या समसमान असेल आणि राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या, मालक व सुरक्षा रक्षक यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांशापेक्षा अधिक असणार नाही.

(५) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमलेल्या सदस्यांपैकी एक सदस्य, जो राज्य शासन या बाबतीत नामनिर्दिष्ट करील, मंडळाचा अध्यक्ष असेल.

(६) अध्यक्षासह मंडळाचे सर्व सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात आल्यावर, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मंडळाच्या सर्व सदस्यांची नावे प्रसिद्ध करील.

(७) मंडळाच्या सदस्यांचा पदावधी, विहित करण्यात येईल असा असेल.

(८) (राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारा सदस्य नसेल अशा) मंडळाच्या प्रत्येक सदस्यास निधीतून, मंडळाच्या सभेत उपस्थित राहण्यासाठी विहित करण्यात येईल अशा दरांनी प्रवास भत्ते आणि दैनिक भत्ते देण्यात येतील.

(९) मंडळाच्या बैठकी व त्या प्रयोजनार्थ अनुसरावयाची कार्यपद्धती आणि तत्संबंधी पूरक किंवा सहाय्यभूत असलेल्या सर्व बाबी यांचे, राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून, मंडळाकडून नियमन करण्यात येईल.

राज्य शासनाचा एक व्यक्ती मंडळ त्यास नेमण्याचा अधिकार.

७. (१) मालकांनी किंवा सुरक्षा रक्षकांनी मंडळावर आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी व्यक्तीची शिफारस करण्यास नकार दिल्यामुळे असो किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे असो, कलम ६ च्या उपबंधास अनुसरून सुरक्षा रक्षकांसाठी मंडळ प्रस्थापित करण्यास राज्य शासन असमर्थ असल्याचे त्यास दिसून येईल त्या बाबतीत, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एका योग्य व्यक्तीची नेमणूक करता येईल, अशी व्यक्ती अशा सुरक्षा रक्षकांसाठी कलम ६ अन्वये यथोचित रीत्या मंडळ प्रस्थापित करण्यात येईतोपर्यंत पदे धारण करील.

(२) अशा रीतीने नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तीचे त्यावेळी मंडळ प्रस्थापित झाल्याचे मानण्यात येईल आणि ती व्यक्ती, या अधिनियमाद्वारे आणि त्याखाली तयार करण्यात आलेल्या योजनेन्वये मंडळास प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि त्याबर लादलेली कर्तव्ये पार पाडील आणि कामे करील. अशी व्यक्ती, कलम ६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मंडळाच्या पहिल्या सभेच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत पदावर राहील.

(३) मंडळ ज्या व्यक्तीचे बनले असेल त्या व्यक्तीस मंडळाच्या निधीमधून शासनाकडून ठरविण्यात येईल असे पारिश्रमिक मिळेल आणि त्याच्या सेवेच्या अटी आणि इतर शर्ती राज्य शासन ठरविल अशा असतील.

मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

८. (१) प्रत्येक योजनेची अंमलबजावणी करण्यास मंडळ जबाबदार असेल आणि ते, योजनेद्वारे त्यास प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील, अशी कर्तव्ये पार पाडील आणि अशी कामे करील.

(२) योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंडळास योग्य वाटतील अशा उपाययोजना त्यास करता येतील.

(३) प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिलनंतर, शक्यतो लवकर आणि ३१ ऑक्टोबरनंतरचा नसेल अशा दिवशी, मंडळ, उक्त वर्षाच्या ३१ मार्च रोजी समाप्त होणाऱ्या मागील वर्षातील योजनेच्या कामाचा वार्षिक अहवाल, राज्य शासनाला सादर करील. अशा रीतीने मिळालेला प्रत्येक अहवाल तो मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असेल तर, त्या अधिवेशनात किंवा अहवाल मिळाल्याच्या तारखेच्या लगतनंतरच्या अधिवेशनात, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

(४) आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कर्तव्ये पार पाडताना आणि कामे करताना मंडळ, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून, राज्य शासन मंडळास वेळोवेळी देईल अशा निदेशांनी बांधलेले असेल.

लेखे व लेखापरीक्षा.

९. (१) मंडळ, यथोचित लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील ताळेबंदासह हिशेबाचे वार्षिक विवरण तयार करील.

(२) राज्य शासन या बाबतीत नियुक्त करील अशा अर्हताप्राप्त व्यक्तीकडून मंडळाचे लेखे दरवर्षी तपासण्यात येतील.

(३) लेखापरीक्षकास, कोणत्याही वाजवी वेळेमध्ये, मंडळाची लेखापुस्तके व इतर अभिलेख उपलब्ध असतील आणि लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक वाटेल असे स्पष्टीकरण व माहिती मागविता येईल किंवा मंडळाच्या कोणत्याही सदस्याची किंवा अधिकाऱ्याची तपासणी करता येईल.

(४) लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह राज्य शासन, या बाबतीत निर्दिष्ट करील अशा तारखेपूर्वी, राज्य शासनाकडे दरवर्षी पाठविण्यात येतील.

(५) लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या अवलोकनानंतर राज्य शासन, त्यास योग्य वाटतील असे जे निदेश देईल त्याचे मंडळ पालन करील.

(६) राज्य शासन ठरवील असा लेखापरीक्षेचा खर्च मंडळाच्या निधीमधून देण्यात येईल.

१०. (१) जी कोणतीही व्यक्ती— अनर्हता आणि काढून टाकणे.

(अ) मंडळाची वेतनी अधिकारी असेल ; किंवा

(ब) अमुक्त नादार असेल ; किंवा

(क) वेडी असल्याचे आढळून आले असेल किंवा विकल मनाची होईल ; किंवा

(ड) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल दोषी असेल किंवा दोषी ठरविण्यात आली असेल, अशा बाबतीत, तिला दोषी ठरवण्यात आल्याच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी लोटला नसेल तर तिला मंडळाचा सदस्य म्हणून निवडण्यात येणार नाही किंवा ती मंडळाचा सदस्य असण्याचे चालू राहणार नाही.

(२) जो कोणताही सदस्य—

(अ) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेच्या कक्षेत येत असेल किंवा आला असेल ; किंवा

(ब) मंडळाच्या परवानगीशिवाय, मंडळाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहील त्या सदस्यास, राज्य शासन पदावरून दूर करू शकेल.

११. मंडळाच्या कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, राज्य शासनाला उद्देशून स्वतःच्या सहीनिशी पत्र लिहून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि राजीनामा स्वीकारल्यानंतर त्याचे पद रिकामे होईल. सदस्याने पदाचा राजीनामा देणे.

१२. मृत्यूमुळे, राजीनाम्यामुळे, अनर्हतेमुळे अथवा पदावरून दूर केल्यामुळे किंवा अन्यथा कोणतीही जागा रिकामी झाल्यास मंडळ तात्काळ ती घटना राज्य शासनाला कळवील; आणि अशी जागा, शक्यतोवर ती रिकामी झाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत भरण्यात येईल आणि जागा भरण्यासाठी नामनिर्दिष्ट करण्यात आलेली व्यक्ती, ज्या सदस्याचे जागी तिला निर्देशित करण्यात आले असेल त्या सदस्याने, पद रिकामे झाले नसते तर जितक्या मुदतीपर्यंत पद धारण केले असते तितक्याच मुदतीसाठी, पद धारण करील : रिकामी जागा शक्य तितक्या लवकर भरणे.

परंतु, अशा रीतीने जागा रिकामी असताना पदावर असणाऱ्या सदस्यांना, जणू जागा रिकामी झालेली नाही असे समजून काम करता येईल.

१३. मंडळाच्या सदस्याची कोणतीही जागा रिकामी आहे किंवा मंडळाच्या रचनेत कोणतीही उणीव आहे, याच केवळ कारणावरून मंडळाच्या कोणत्याही कृतीसंबंधी किंवा कामकाजासंबंधी हरकत उपस्थित केली जाणार नाही किंवा ते विधि अग्राह्य ठरणार नाही. कामकाज योग्य आणि विधिग्राह्य असल्याचे मानणे.

मालक आणि सुरक्षा रक्षक यांजकडून येणे असलेल्या रकमांचे निर्धारण.

१४. (१) मंडळास किंवा त्याने या बाबतीत विनिर्दिष्ट केले असेल अशा अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही योजनेन्वये कोणत्याही मालकाकडून किंवा सुरक्षा रक्षकाकडून येणे असलेल्या रकमेचे निर्धारण, आदेशाद्वारे करता येईल आणि या प्रयोजनासाठी मंडळास किंवा अशा अधिकाऱ्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करता येईल.

(२) पोट-कलम (१) खाली चौकशी करणारे मंडळ किंवा असा अधिकारी यास, अशा चौकशीच्या प्रयोजनार्थ, पुढील बाबींच्या संबंधातील एखाद्या वादाची न्यायचौकशी करताना, जे अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये न्यायालयाकडे निहित आहेत तेच अधिकार असतील--- १९०८ चा ५.

(अ) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहाण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ब) दस्तऐवज शोधून काढण्यास व ते हजर करण्यास भाग पाडणे ;

(क) शपथपत्रावर पुरावा घेणे ;

(ड) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी राजादेश (कमिशन) काढणे;

आणि अशा प्रकारची कोणतीही चौकशी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९६ च्या प्रयोजनासाठी आणि तिची कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थान्तर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

(३) कोणत्याही मालकास किंवा यथास्थिति सुरक्षा रक्षकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम निर्धारित करणारा कोणताही आदेश पोट-कलम (१) अन्वये दिला जाणार नाही.

(४) या कलमान्वये दिलेला आदेश हा अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही.

(५) या कलमान्वये निर्धारित करण्यात आलेली कोणतीही रक्कम, जर अशी रक्कम थकबाकी म्हणून असेल तर, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

सल्लागार समिती.

१५. (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या [illegible] योजनेच्या अंमलबजावणीमधून किंवा रक्षक व मालक यांच्या कोणत्याही विवक्षित वर्गास या अधिनियमाचे उपबंध [illegible] संस्थासंबंधात उद्भवतील अशा, सल्लागार समितीस स्वत: आवश्यक वाटणाऱ्या किंवा राज्य शासनाकडून सल्ल्यासाठी तिच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या बाबींसंबंधी, सल्ला देण्यासाठी म्हणून सल्लागार समितीची रचना करता येईल.

(२) सल्लागार समितीचे सदस्य राज्य शासनाकडून नेमण्यात येतील आणि ती विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांची मिळून होईल व त्यांची विहित करण्यात आलेल्या रीतीने निवड करण्यात येईल :

परंतु, सल्लागार समितीत, मालक, सुरक्षा रक्षक व राज्य विधानमंडळ यांचे प्रतिनिधित्व करणारे समसमान संख्येतील सदस्य आणि समितीच्या एकूण सदस्यांच्या एक-चतुर्थांशापेक्षा अधिक असणार नाहीत इतके राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य यांचा समावेश होईल.

(३) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमलेल्या सदस्यांपैकी एक सदस्य---जो राज्य शासन या बाबतीत नामनिर्दिष्ट करील---सल्लागार समितीचा अध्यक्ष असेल.

(४) राज्य शासन, सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांची नावे शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील.

(५) सल्लागार समितीच्या बैठकी आणि त्यासाठी अनुसरावयाची पद्धती यांचे नियमन या अधिनियमाद्वारे केलेल्या नियमांनुसार करण्यात येईल.

(६) सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी विहित करण्यात येईल असा असेल.

(७) सल्लागार समितीच्या सदस्यास (राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारा सदस्य नसेल अशा) समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी विहित करण्यात येईल अशा दरांनी प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मिळेल.

१६. (१) मंडळास या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही योजनेच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशा, विहित करण्यात आलेल्या अर्हता असलेल्या व्यक्तींची, निरीक्षक म्हणून, नेमणूक करता येईल आणि त्यांच्या अधिकारितेच्या मर्यादा निश्चित करता येतील. निरीक्षक व त्यांचे अधिकार.

(२) राज्य शासनाने या बाबतीत केलेल्या नियमास अधीन राहून, निरीक्षकास—

(अ) सुरक्षा रक्षक कामावर ठेवण्यात आले असतील अशा किंवा ज्या कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत सुरक्षा रक्षकांना काम देण्यात येत असेल अशा कोणत्याही जागेत किंवा ठिकाणी, त्यास योग्य वाटेल अशा सहाय्यकांसह, कोणतेही नोंदणीपुस्तक, वेतनविषयक अभिलेख अथवा कोणत्याही योजनेन्वये ठेवणे किंवा प्रदर्शित करणे आवश्यक असेल अशा नोटिसा, यांची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही वाजवी वेळेमध्ये प्रवेश करता येईल आणि तपासणीसाठी, त्या सादर करण्यास फर्मावता येईल ;

(ब) अशा कोणत्याही जागांमध्ये किंवा ठिकाणी आढळणाऱ्या आणि जी व्यक्ती तेथे कामावर ठेवलेला सुरक्षा रक्षक आहे किंवा तेथे ज्यास काम देण्यात येते असा सुरक्षा रक्षक आहे असे त्यास सकारण वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीची तपासणी करता येईल ;

(क) सुरक्षा रक्षकाला किंवा सुरक्षा रक्षकांच्या गटाला कोणतेही काम देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ज्यांना काम देण्यात आले असेल अशा व्यक्तींची नावे व पत्ते व उक्त कामासाठी दिलेली किंवा द्यावयाची रक्कम या संबंधातील जी माहिती देणे त्याच्या अखत्यारात असेल अशी कोणतीही माहिती देण्यास फर्मावता येईल ;

(ड) जो अपराध मालकाने केला असल्याचे त्यास सकारण वाटत असेल अशा या अधिनियमाखालील किंवा कोणत्याही योजनेखालील अपराधाशी जी संबंधित असल्याचे त्यास वाटेल अशी नोंदणी पुस्तके, वेतनविषयक अभिलेख किंवा नोटिसा किंवा त्याचा भाग ताब्यात घेता येईल किंवा त्याच्या प्रती घेता येतील ; आणि

(इ) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करता येईल :

परंतु, या कलमाच्या उपबंधान्वये कोणालाही, ज्यामुळे तो स्वतः गुन्ह्यात गोवला जाईल अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा कोणतेही निवेदन करण्यास भाग पाडले जाणार नाही.

१८६० चा ४५. (३) या कलमान्वये नेमण्यात आलेला प्रत्येक निरीक्षक हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

१७. (१) कोणतेही न्यायालय योजनेन्वये शिक्षापात्र म्हणून ठरविण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाची किंवा असा अपराध घडावा म्हणून देण्यात आलेल्या कोणत्याही अपप्रेरणेची, निरीक्षकाने किंवा मंडळाने अथवा राज्य शासनाने या बाबतीत विशेष रीत्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने लेखी तक्रार केली असल्याशिवाय दखल घेणार नाही. अपराधांची दखल घेणे.

१९७४ चा २. (२) फौजदारी व्यवहार संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी, यालाच केवळ योजनेन्वये शिक्षापात्र असलेला अपराध किंवा त्यासाठी दिलेली अपप्रेरणा याची न्यायचौकशी करता येईल.

१८. कोणत्याही मुलास सुरक्षा रक्षक म्हणून काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा त्यास तशी परवानगी देण्यात येणार नाही. मुलांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध.

**स्पष्टीकरण.**—"मूल" म्हणजे ज्या व्यक्तीच्या वयाची चौदा वर्षे पूर्ण झाली नसतील अशी व्यक्ती.

१९. कामगार नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ याचे उपबंध आणि त्याखाली वेळोवेळी करण्यात आलेले नियम हे, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत कामावर ठेवलेल्या, नोंदलेल्या, सुरक्षा रक्षकांना आवश्यक त्या फेरफारांसह लागू होतील— आणि त्या प्रयोजनार्थ, ते उक्त अधिनियमाच्या अर्थांतर्गत कामगार असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा कामगाराच्या संबंधात मालक याचा अर्थ, एखादे मंडळ अशा कोणत्याही कामगारास वेतन देत असेल त्या बाबतीत मंडळ आणि इतर कोणत्याही बाबतीत, या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणेचा मालक, असा असेल. सुरक्षा रक्षकांना कामगार नुकसान-भरपाई असे अधिनियम लागू करणे.

३६६



**वेतन देण्याबाबत अधिनियम सुरक्षा रक्षकांना लागू असणे.**

२०. (१) वेतन देण्याबाबत अधिनियम, १९३६ (यात यानंतर या कलमामध्ये ज्याचा उक्त "अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, उक्त अधिनियमाचे किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या नियमांचे सर्व किंवा कोणतेही उपबंध, नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या संबंधात, मालक याचा अर्थ, ज्याद्वारे मंडळ अशा कोणत्याही रक्षकांना वेतन देत असेल त्या बाबतीत असे मंडळ आणि इतर कोणत्याही बाबतीत या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणेचा मालक असा असेल या फेरबदलासह, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत कामावर ठेवलेल्या सर्व नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांना किंवा नोंदलेल्या सुरक्षा रक्षकांच्या कोणत्याही वर्गास लागू होतील ; आणि उक्त अधिनियमाचे उपबंध अशा रीतीने लागू करण्यात आल्यावर, त्या अधिनियमान्वये नेमण्यात आलेला निरीक्षक, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमध्ये उक्त अधिनियमाच्या अशा उपबंधाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ निरीक्षक, असल्याचे मानण्यात येईल. १९३६ चा ४.

(२) राज्य शासनास, केवळ सल्लागार समितीने तसा सल्ला दिला असेल तर, तत्सम अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना रद्द करता येईल किंवा तीत बदल करता येईल.

**स्त्री सुरक्षा रक्षकांना प्रसूतिविषयक लाभ अधिनियम लागू असणे.**

२१. प्रसूतिविषयक लाभ अधिनियम, १९६१ (ज्याचा या कलमात यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, उक्त अधिनियमाचे किंवा तदन्वये केलेल्या नियमांचे सर्व किंवा कोणतेही उपबंध, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत काम करणाऱ्या नोंदलेल्या, स्त्री सुरक्षा रक्षकांना लागू होतील ; आणि त्या प्रयोजनार्थ त्या उक्त अधिनियमाच्या अर्थानुसार स्त्रिया असल्याचे मानण्यात येईल ; आणि अशा स्त्रियांच्या संबंधात, मालक याचा अर्थ एखादे मंडळ अशा कोणत्याही स्त्रियांना वेतन देत असेल त्या बाबतीत, असे मंडळ व इतर कोणत्याही बाबतीत, या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणेचा मालक, असा असेल ; आणि उक्त अधिनियमाचे उपबंध अशा रीतीने लागू करण्यात आल्यावर, या अधिनियमान्वये नेमण्यात आलेला निरीक्षक हा, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमध्ये, उक्त अधिनियमाच्या अशा उपबंधांच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ निरीक्षक असल्याचे मानण्यात येईल. १९६१ चा ५३.

**विवक्षित प्रकरणी इतर कायद्यांखालील अधिकार व विशेषाधिकार यांवर परिणाम न होणे.**

२२. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत काम करणाऱ्या कोणत्याही नोंदलेल्या सुरक्षा रक्षकास हा अधिनियम अमलात येईल त्या तारखेस, इतर कोणताही कायदा, करार, रूढी किंवा परिपाठ यान्वये जे कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार मिळण्याचा हक्क असेल त्या अधिकारांवर किंवा विशेषाधिकारांवर जर असे अधिकार किंवा विशेषाधिकार हे या अधिनियमान्वये आणि योजने अन्वये त्यास जे मिळण्याचा हक्क प्राप्त होईल अशा अधिकारांपेक्षा किंवा विशेषाधिकारांपेक्षा जास्त फायदेशीर असतील तर, परिणाम होणार नाही :

परंतु अशा सुरक्षा रक्षकास या अधिनियमाच्या उपबंधान्वयेचा व योजनेन्वयेचा कोणताही तत्सम फायदा मिळण्याचा हक्क असणार नाही.

**माफी.**

२३. राज्य शासनास, सल्लागार समितीशी विचारविनिमय केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून आणि अशा मुदतीपर्यंत, कोणत्याही कारखान्यात किंवा कोणत्याही आस्थापनेत किंवा कारखान्याच्या वा आस्थापनेच्या कोणत्याही वर्गात कामावर ठेवलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सर्व किंवा कोणत्याही वर्गास, जर राज्य शासनाच्या मते असे सर्व सुरक्षा रक्षक किंवा सुरक्षा रक्षकांचा/चे वर्ग यांस, हा अधिनियम किंवा त्या अन्वये तयार करण्यात आलेली कोणतीही योजना यानुसार किंवा तदन्वये, अशा रक्षकांसाठी तरतूद करण्यात आलेल्या फायद्यापेक्षा एकंदरीत पाहता, कमी फायदेशीर नसणारे लाभ मिळत असतील तर, या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उपबंध किंवा त्या अन्वये करण्यात आलेली योजना यांच्या अंमलबजावणीतून माफी देता येईल :

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, राज्य शासन अशी अधिसूचना काढण्याच्या आपल्या इराद्याची नोटीस प्रसिद्ध करील आणि त्या बाबतीत हरकती व सूचना मागवील आणि अशी कोणतीही अधिसूचना, हरकतींचा व सूचनांचा विचार करण्यात येईपर्यंत व ती नोटीस,

शासकीय राजपत्रात प्रथम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याची मुदत समाप्त होईपर्यंत काढण्यात येणार नाही :

आणखी असे की, राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही वेळी, कारणे विनिर्दिष्ट करून पूर्वोक्त अधिसूचना विखंडित करता येईल.

२४. (१) राज्य शासनास, कोणत्याही मंडळाच्या किंवा योजनेच्या कामकाजाची तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी, आणि त्या बाबतीत राज्य शासनास अहवाल सादर करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही वेळी, नेमणूक करता येईल. मंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी.

(२) तपासणीचे किंवा चौकशीचे काम योग्य प्रकारे करणे शक्य व्हावे म्हणून, अशा रीतीने नेमण्यात आलेल्या व्यक्तीस, मंडळ, सर्व सोयी उपलब्ध करून देईल आणि तिला आवश्यक असतील अशी मंडळाच्या ताब्यातील कागदपत्रे, लेखे किंवा माहिती पुरवील.

(३) कोणत्याही मंडळाच्या किंवा योजनेच्या कामकाजाची तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी अशा रीतीने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमान्वये नेमलेल्या निरीक्षकाच्या सर्व अधिकारांचा वापर करता येईल.

२५. (१) कलम २४, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अहवालाचा विचार केल्यानंतर किंवा अन्यथा, राज्य शासनाचे असे मत होईल की,— मंडळाचे अधिक्रमण.

(अ) मंडळ आपली कामे पार पाडण्यास व कर्तव्ये बजावण्यास असमर्थ आहे ; किंवा

(ब) मंडळाने, आपली कामे पार पाडण्यात व कर्तव्ये बजावण्यात सतत कसूर केली आहे किंवा आपल्या अधिकारांचे अधिक्रमण किंवा दुरुपयोग केला आहे ;

तर राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, मंडळ निष्प्रभावित करता येईल आणि अधिक्रमणाच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या मुदतीत, विहित करण्यात आलेल्या रीतीने त्याची पुनर्रचना करता येईल. तत्सम अधिसूचनेद्वारे, पुरेशा कारणांवरून, राज्य शासनास अधिक्रमणाची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीने वाढविता येईल :

परंतु खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणावरून, या पोट-कलमाखालील अधिसूचना काढण्यापूर्वी, राज्य शासन, मंडळाचे अधिक्रमण का करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची मंडळास वाजवी संधी देईल आणि मंडळाची कोणतीही स्पष्टीकरणे व कोणतेही आक्षेप असल्यास, त्यांचा विचार करील.

(२) मंडळाचे अधिक्रमण करण्यात आल्यानंतर आणि त्याची पुनर्रचना करण्यात येईतोपर्यंत, ह्या अधिनियमान्वयेच्या व कोणत्याही योजनेन्वयेच्या मंडळाचे अधिकार, कर्तव्ये व कामे ही, राज्य शासनाकडून किंवा या प्रयोजनाकरिता राज्य शासन नेमील अशा अधिकाऱ्याकडून किंवा अधिकाऱ्यांकडून अनुक्रमे वापरण्यात, बजावण्यात आणि पार पाडण्यात येतील.

(३) मंडळाचे अधिक्रमण होईल तेव्हा पुढील परिणाम होतील, म्हणजेच—

(अ) मंडळाचे सर्व सदस्य, पोट-कलम (१) खालील अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून आपली पदे सोडतील;

(ब) मंडळास ज्यांचा वापर करता येईल असे सर्व अधिकार व पार पाडता येतील अशी सर्व कर्तव्ये वा कामे, अधिक्रमणाच्या मुदतीत, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून अनुक्रमे वापरण्यात किंवा पार पाडण्यात येतील;

(क) मंडळामध्ये निहित असलेले सर्व निधी व इतर मालमत्ता, अधिक्रमणाच्या मुदतीत, राज्य शासनामध्ये निहित होईल आणि मंडळाची पुनर्रचना झाल्यावर, असे निधी व मालमत्ता, मंडळामध्ये पुन्हा निहित होईल.

२६. या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही योजनेखाली, सुरक्षा रक्षकास जो कोणताही अधिकार प्रदान करण्यात आला असेल किंवा त्यास जो कोणताही विशेष अधिकार किंवा सवलत प्राप्त झाली असेल तो अधिकार, विशेष अधिकार, किंवा सवलत ही, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर करण्यात आलेला कोणताही करार किंवा कबुलायत यामुळे त्यास सोडून द्यावी लागत असेल तर, असा अधिकार किंवा विशेष अधिकार किंवा सवलत यापासून तो वंचित होतो असा उक्त करार किंवा कबुलायत यावरून अर्थ अभिप्रेत होत असेल तेथवर, असा करार किंवा कबुलायत ही, निरर्थक होऊन परिणामक्षम असणार नाही. करार मुक्त होणे.

**अपराधाबद्दल सर्वसाधारण शास्ती.**

२७. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर, पाचशे रुपयांच्या मर्यादेपर्यंत दंडाची शिक्षा होईल आणि अशा रीतीने उल्लंघन करण्याचे चालू ठेवल्याच्या बाबतीत, असे उल्लंघन करण्याचे चालू राहिले असेल अशा प्रत्येक दिवसाकरिता शंभर रुपयांच्या मर्यादेपर्यंत आणखी दंडाची शिक्षा होईल.

**या अधिनियमान्वये केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.**

२८. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेली कोणतीही योजना किंवा कोणताही नियम किंवा आदेश यानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासन किंवा मंडळ किंवा मंडळाचा किंवा सल्लागार समितीचा अध्यक्ष, सचिव किंवा कोणताही सदस्य, किंवा कोणताही निरीक्षक किंवा मंडळाचा इतर कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन, कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**नियम करण्याचा अधिकार.**

२९. (१) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील, अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमान्वये नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करील.

(२) या अधिनियमात अन्यत्र, अंतर्भूत असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता, राज्य शासनास, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी, या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील.

**राज्य विधानमंडळासमोर नियम व योजना ठेवणे.**

३०. या अधिनियमान्वये तयार केलेली प्रत्येक योजना आणि नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या योजनेत किंवा नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे मान्यता देतील किंवा योजना अथवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे मान्य करतील आणि शासकीय राजपत्रात असा निर्णय अधिसूचित करतील तर अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून, योजना किंवा नियम यथास्थिती अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही; तथापि, असे फेरबदल किंवा विलोपन यामुळे उक्त योजना, किंवा यथास्थिती नियम याअन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**सन १९८१ चा महा. अध्यादेश क्र. ५ याचे निरसन व व्यावृत्ती.**

३१. (१) महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अध्यादेश, १९८१ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९८१ चा महा. अध्या. ५.

(२) अशा रीतीने निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही (काढलेली कोणतीही अधिसूचना, केलेले कोणतेही नियम, योजना किंवा कोणताही आदेश धरून) या अधिनियमाच्या संबंधित उपबंधान्वये यथास्थिती केलेली, काढलेली किंवा तयार केली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.